# पनवेल महानगरपालिका

*ता.पनवेल, जि.रायगड*

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक ३५०

================================================================

**कार्यालय** :- आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१० २०६
दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२ Email Id : panvelcorporation@gmail.com

================================================================

जा.क्र.पमपा/आस्था/२९२३/प्र.क्र.१३/४९२/२४ दिनांक :- १४/०२/२०२४

**विषय** :- पनवेल महानगरपालिकेने टि.सी.एस. द्वारे, दि.०८/१२/२०२३ ते दि.११/१२/२०२३ या कालावधीत घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेची **पदनिहाय निवडसूची** प्रसिद्ध करणेबाबत.

पनवेल महानगरपालिकेने टि.सी.एस. द्वारे, दि.०८/१२/२०२३ ते दि.११/१२/२०२३ या कालावधीत पदभरतीकरीता घेतलेल्या ऑनलाईन परीक्षेमध्ये उमेदवारांना पदनिहाय प्राप्त झालेले गुण पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.२०/०१/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले होते.

सदर परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमानुसार एकूण ४१ संवर्गापैकी २७ संवर्गाची पदनिहाय **निवडसूची** (प्रतिक्षायादीसह) दि.१३/०२/२०२४ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर याद्वारे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. उर्वरित १४ संवर्गापैकी ८ संवर्गांची पदनिहाय निवडसूची (प्रतिक्षायादीसह) याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. ते खालील प्रमाणे :

| अ.क्र. | संवर्ग |
|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) |
| २ | परिचारिका (ANM) |
| ३ | अधिपरिचारिका (GNM) |
| ४ | कनिष्ठ लिपिक (लेखा) |
| ५ | वैद्यकीय अधिकारी |
| ६ | उद्यान पर्यवेक्षक |
| ७ | लघु लिपिक टंकलेखक |
| ८ | माळी |

उर्वरित खालील ०६ संवर्गाचा निकाल मे. टि.सी.एस. कडून अद्याप अप्राप्त आहे. तो प्राप्त झाल्याबरोबर (पुढील ७ दिवसाच्या आत कधीही) जाहिर करण्यात येईल.

**निकाल प्रलंबित संवर्ग**

| अ.क्र. | संवर्ग |
|---|---|
| १ | लिपिक टंकलेखक |
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ३ | उप अग्निशमन अधिकारी |
| ४ | प्रमुख अग्निशमन विमोचक |
| ५ | अग्निशामक |
| ६ | ड्रायव्हर कम ऑपरेटर |

निवडसुचीनुसार निवड झालेल्या उमेदवाराने आपणांस दस्ताऐवज पडताळणीसाठी दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे दस्ताऐवज तपासणीकरीता उपस्थित रहावे. जे उमेदवार दस्ताऐवज पडताळणीसाठी उपस्थित राहणार नाहीत, त्या उमेदवारांना निवडसुची मधून वगळण्यात येईल. दस्तऐवज पडताळणीसाठी हजर राहण्याचा दिनांक व वेळ निवडसूचीमधील उमेदवारास त्यांच्या वैयक्तिक Email ID वर पत्राव्दारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

सदर निवडसूचीमधील निवड झालेले उमेदवार विहित कालावधीत रुजू न झाल्यास व त्यांचा रुजु होण्यासाठी विहीत केलेला कालावधी संपुष्टात आल्यानंतर, प्रतिक्षायादीमधील पात्र उमेदवारांचा सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय / गुणानुक्रमे नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

तसेच वरीलप्रमाणे प्रतिक्षायादीमधील निवड झालेले उमेदवार, त्यांना रुजू होण्यासाठी दिलेल्या विहीत कालावधीत रुजू न झाल्यास, यामुळे रिक्त राहिलेली पदे भरण्यासाठी उर्वरित पदनिहाय गुणवत्तायादी मधील पात्र उमेदवारांचा वरीलप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय / गुणानुक्रमे नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

सदर निवडसूची दि.१४/०२/२०२४ पासून पुढील केवळ ०१ वर्ष कालावधीसाठीच म्हणजे दि.१३/०२/२०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत वैध राहील याची नोंद उमेदवारांनी घेण्यात यावी.

**सोबत** - निवडसूची

**(गणेश देशमुख)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**पनवेल महानगरपालिका**